**रे.दि.मु. १३५/२०२४**

**निशाणी ५३**

**वादी  कडून साक्षीदार क्र.३  चा सरतपास**

नाव –    अनिता अविनाश चौगुले  व.व. ५९

व्यवसाय  –  सेवानिवृत्त मुख्याध्यापक

रा. नेमिनाथ नगर सांगली  ता. मिरज   जि. सांगली

**वादी  कडून  साक्षीदार क्र. ३ यांचा सरतपास विधीज्ञ आर. बी. मजले वकील यांचेकडून शपथेवर सुरु**

१.  मी महानगरपालिका शाळा क्र. १० मिरज येथून प्रभारी मुख्याध्यापक म्हणून ऑक्टोबर २०२४ मध्ये सेवानिवृत्त झाले आहे. मी जानेवारी २०२४ ते  ऑक्टोबर २०२४ या कालावधी मध्ये सदर शाळेमध्ये प्रभारी मुख्यापक म्हणून होते. शाळेमध्य प्रवेश घेणा–या विद्यार्थ्यांची शाळेतील रजिस्टर मध्ये नोंद घेतली जाते.  आता साक्षीदार यांना नि. ४८ वरील  शाळेच्या जनरल रजीस्टरची प्रत दाखविण्यात आली. सदरच्या रजिस्टर मध्ये अनुक्रमां ३५१ या मध्ये कुमारी बाळाबाई विष्णू कांबळे यांचे शाळेमध्ये प्रवेश घेतलेबाबत नोंदी आहेत. सदर नोंदी मध्ये जात पोट जात – हिंदू महार , जन्मस्थळ मिरज, जन्म तारीख ०१.०१.१९४६, नवीन प्रवेश, शाळेत दाखल केल्याची तारीख ३०.०८.१९५२, इयत्ता १ ली ब मध्ये, शाळा सोडल्याची तारीख ०८.१२.१९५३ अशी नोंद आहे. आता मला आर्टीकल अ शाळा सोडल्याचा दाखला दाखविण्यात आला. सदरचा दाखला महानगरपालिका शाळा क्र. १० मिरज हा शाळेचा असून त्याचा जनरल रजिस्टर क्र. ३५१ असून अनुक्रमांक २३७८ असा आहे. सदरचा दाखल हा बाळाबाई विष्णू कांबळे यांचा असून त्यामध्ये जात पोट जात – हिंदू महार , जन्मस्थळ मिरज, जन्म तारीख ०१.०१.१९४६, नवीन प्रवेश, शाळेत दाखल केल्याची तारीख ३०.०८.१९५२, इयत्ता १ ली ब मध्ये, शाळा सोडल्याची तारीख ०८.१२.१९५३ अशी नोंद आहे. सदरच्या दाखल्यावर माझी प्रभारी मुख्याध्यापक म्हणून सही आहे. सदरचा दाखला हा मी शाळेच्या जनरल रजिस्टर नोंदी  वरुन दिलेला आहे. सदरचा दाखला व निशानी ४८ वरील रजिस्टर मधील नोंदी या एकच असून त्या ख–या व बरोबर आहेत. सदरच्या दाखल्यास **नि. ५४** देण्यात येते.

**साक्षीदाराचा  सरतपास पूर्ण**

**प्रतिवादी व विधीज्ञांचा पुकारा केला असता गैरहजर प्रतिवादी विरुध्द प्रतिवादी कडून साक्षीदाराचा उलटतपास नाही**.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

मिरज (ए.एस. राणे)

दिनांक ०२/०३/२०२६ दिवाणी न्यायालय क. स्तर, मिरज

प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, सदर साक्षीदाराचा जबाब माझे समक्ष खुल्या न्यायालयात नोंदविला असून त्यातील मजकूर साक्षीदारास वाचुन व समजावुन सांगितला असता त्याने मजकूर खरा व बरोबर असल्याचे मान्य केले.

ANIRUDHA SUNIL RANE Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE

मिरज (ए.एस. राणे)

दिनांक ०२/०३/२०२६ दिवाणी न्यायालय क. स्तर, मिरज